# मैत्री आरोग्याशी..

✤ सप्टेंबर २०१२ ✤ वर्ष तिसरे ✤ अंक चौथा

सर्व सहयोगिनीताईंना नमस्कार. सर्वप्रथम ज्या विभागातील सहयोगिनींनी स्पर्धेत सहभाग घेतला आणि विजेत्या ठरल्या त्यांचे मनःपूर्वक कौतुक आणि आभिनंदन. आपला स्पर्धेतला वाढणारा सक्रिय सहभाग 'आपण अंक वाचत आहात' हे दर्शविते.

यावेळेसच्या अंकात एच.आय.व्ही./एड्स संदर्भातील वेगळया कार्यक्रमाची माहिती दिली आहे. फिल्डमध्ये काम करताना महिला यासंदर्भात आपल्याला अनेक प्रश्न विचारतात पण प्रत्येक वेळेस आपणाला सर्वच बाबी माहिती असतील असे होत नाही. म्हणूनच मुद्दाम एच.आय.व्ही. होण्याची कारणं, प्रतिबंधात्मक उपाय आणि कॉंडोमचा वापर यापलीकडे जावून 'पालकांकडून बाळाला होणारे एच. आय.व्ही. संक्रमण प्रतिबंधात्मक कार्यक्रम' याविषयीची मांडणी आरोग्य सदरात दिली आहे.

याशिवाय शासकीय योजनेत 'विधवा निवृत्तीवेतन' योजनेसंदर्भात माहिती दिली आहे. तर कायद्याच्या सदरात 'कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ' याची सविस्तर माहिती दिली आहे. शासकीय योजनेचा फायदा किमान आपल्या बचत गटातील महिलांपर्यंत होईल ही इच्छा.

आपल्याशी संवाद करताना दुष्काळाची परिस्थिती आणि आरोग्य, विशेषतः महिलांचे आरोग्य याविषयी मनात विचार घोळत आहे. मागील सलग दोन अंकातील आरोग्य सदरातील माहितीचा तुम्हाला निश्चितच उपयोग होण्याबरोबरच इतरही महिलांपर्यंत पोहोचत असेल हि अपेक्षा.

अंकातील माहिती संदर्भात किंवा फिल्ड मधील अनुभवासंबंधी आपणास विचार किंवा मत मांडायचे असल्यास जरुर कळवा. तुमची मतं आणि प्रतिक्रिया जाणून घ्यायला आवडेल. आपल्या सकारात्मक प्रतिसादाच्या प्रतीक्षेत.

आपला,<br>
अ. द. काळे, भाप्रसे<br>
माविम, मुंबई

## या अंकात...


| | |
|---|---|
| एच.आय.व्ही. – पी.पी.टी.सी.टी. | 2 |
| स्पर्धेत उतरा तर खरं | 3 |
| हे बदलाया हवं | 4 |
| कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ/गैरवर्तन | 6 |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना | 8 |


एकजुटीतून अवतरेल समृध्दीची नवप्रभा

MAVIM

माविम

प्रकाशक : श्री. अ. द. काळे, भाप्रसे माविम, मुंबई  लेखन व संपादन : तथापि ट्रस्ट, पुणे
संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी, मुंबई यांच्या सहाय्याने


# एच.आय.व्ही. - पी.पी.टी.सी.टी. कार्यक्रम

प्रमोद शिंपी

भारतात अंदाजे २४ लाख व्यक्ती एच.आय.व्ही सह जगत आहेत. यामध्ये ३८ टक्के स्त्रिया तर ३१ टक्के युवक आहेत. देशात एच.आय.व्ही. चे सर्वाधिक प्रमाण असलेल्या ६ राज्यांपैकी महाराष्ट्राचा क्रमांक दुसरा आहे. हे चित्र निश्चितच बदलू शकते. यासाठी गरज आहे आपण मोकळेपणाने बोलण्याची आणि सकारात्मक प्रतिबंधात्मक कृती करण्याची.

एच.आय.व्ही म्हणजे माणसाच्या शरीरातील रोगप्रतिकार शक्ती कमी करणारा विषाणू तर एड्स म्हणजे विषाणूमुळे होणारा रोगप्रतिकार शक्ती नाहिशी झाल्याने व्यक्तीला विविध रोगांची लागण होते. यामध्ये रोगप्रतिकार शक्ती कमी होते व पुढे हळूहळू नष्टच होत जाते. हया अवस्थेला एड्स असे म्हणतात. थोडक्यात एच.आय.व्ही. हया विषाणूमुळे माणसाला प्राप्त होणारी अवस्था म्हणजे एड्स होय. एखादया व्यक्तीला एच.आय.व्ही ची लागण झाली किंवा नाही हे फक्त रक्ताची तपासणी केल्यानंतरच कळते. शासकीय रुग्णालयात हि तपासणी मोफत केली जाते. व्यक्तीला एच.आय.व्ही. होण्याचे फक्त चार आणि चारच मार्ग आहेत. यामध्ये १. असुरक्षित लैंगिक संबंध २.दूषित सुया किंवा इंजेक्शन ३. दूषित रक्त आणि ४. एच.आय.व्ही. संसर्गित मातेपासून तिच्या होणा-या बाळाला. इतर सर्व कारणं गैरसमज आहेत. उदा. मच्छर किंवा ढेकूण चावल्याने, संसर्गित व्यक्तीने वापरलेली भांडी व कपडे इतरांनी वापरल्याने किंवा एकत्र राहिल्याने इ. एच.आय.व्ही ज्या चार करणांमुळे होतो त्यातील चौथ्या कारणाचा आपण सविस्तर विचार करणार आहोत. कारण तो महिलांचे आरोग्यासंबंधी तर आहेच शिवाय आपण करीत असलेल्या कामाचा तो अविभाज्य भाग आहे. आपल्या मार्फत याविषयीची माहिती आपल्या राज्यातील प्रत्येक गावाच्या कानाकोप-यापर्यंत पोहचणार आहे.

आपणाला माहित आहे की, एच.आय.व्ही चा विषाणू मानवी शरीरात रक्त आणि स्त्रावात जिवंत राहतो. रक्तात त्याचे प्रमाण अधिक असते तर स्त्रावांमध्ये विशेषतः लाळेत हे प्रमाण नगन्य किंवा अत्यल्प असते. मात्र एच.आय. व्ही. संसर्गित मातेपासून तिच्या होणा-या बाळाला एच.आय. व्ही. चा संसर्ग बाळ गर्भात असताना, बाळंतपणात बाळ बाहेर येत असतांना त्याला जखम होवून त्यात रक्त किंवा स्त्राव जावून आणि दुधावाटे होवू शकतो. मातेपासून पासून बाळाला होणारा हा संसर्ग आपण निश्चितच थांबवण्यासाठी मदत करु शकता.




यासाठी अंगणवाडी ताईच्या सहकार्याने गावातील प्रत्येक गरोदर मातेची नाव नोंदणी सरकारी दवाखान्यात लवकरात लवकर होवून तिला आरोग्य सेवा मिळणे गरजेचे आहे. जेणेकरुन पी.एच.सी. (प्राथमिक आरोग्य केंद्र) व आय.सी.टी.सी. यांच्या सहकार्याने (एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र) तिच्या रक्ताची तपासणी केली जाईल. (याकाळात रक्ताची इतरही कारणांसाठी तपासणी केली जाते. परंतु प्रत्येक गरोदर स्त्रिची एच.आय.व्ही तपासणी करणे हे सक्तीचे आहे.) रक्ताची ही तपासणी मोफत केली जाते. ज्याचा रिपोर्ट गोपनीय म्हणजे संबंधित स्त्रीलाच दिला जातो. एखादी स्त्री एच.आय.व्ही. संसर्गित असेल तर तिचे बाळंतपण सरकारी दवाखान्यात होणे गरजेचे आहे. कारण बाळंतपणाच्या कळा सुरु असतांना किंवा बाळंतपणाच्या दोन तास आधी नेव्हिरेपीन नावाचे औषध / गोळी संबंधित महिलेला मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शिवाय बाळ जन्माला आल्यानंतर बहात्तर तासाच्या आत बाळास नेव्हीरेपीनचे पातळ औषध दिले जाणे गरजेचे आहे. जे ताबडतोब मिळणे अत्यंत गरजेचे आहे. हे औषध शरीरात कसं काम करतं या विषयात किंवा खोलात आपण जायला

नको. मात्र संबंधित स्त्रीला दवाखान्यातील डॉक्टर व आय.सी. टी.सी. केंद्राचे समुपदेशक किंवा कौन्सलर यांचा सल्ला मानणे गरजेचे असते. जेणेकरुन आई आणि बाळाच्या जिवाला धोका निर्माण होणार नाही. ही संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी म्हणून विशेष कार्यक्रम भारतात सर्वत्र राबविला जातो. याचे नाव आहे 'माता-पित्याद्वारे बाळाला होणारा एच.आय.व्ही. संक्रमण प्रतिबंधात्मक कार्यक्रम'.

आपल्या राज्यात नॅको (राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था), एमसॅक्स (महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था) तसेच आय.एल.एफ. यांच्या मार्फत महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने राबविला जातो. हा कार्यक्रम अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचावा म्हणून संस्थेची कार्यकर्ती (ORW) काम करते. तिच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमातून कार्यक्रम घेत असते यामध्ये महिला मंडळ, बचत गट इ. सोबत बैठक घेणे, पथनाटय इ. वापर करते.

आपल्या कामाच्या दृष्टीने इथे आपली भूमिका अत्यंत महत्वाची आहे. बचत गटातील बैठकीला आपण तिला बोलवून विषयाची मांडणी करण्यास सांगून याविषयी जाणिव जागृती करण्यास मदत करु शकतो, एच.आय.व्ही. संसर्गित महिलेला तिच्या आरोग्याचा अधिकार मिळवून देण्याबरोबरच तिच्या आई होण्याच्या अधिकारही मिळवून देण्यास मदत करु शकतो. शिवाय एका बाळाचा जीव वाचतो. आपण सहयोगिनी आपल्या कार्यक्षेत्रात एच.आय.व्ही-एड्स विषयी शास्त्रीय माहितीचा प्रचार आणि प्रसार करण्याबरोबरच प्रतिबंधात्मक कामास निश्चितच मदत करु शकता. हे 'मानवतेचे' काम करण्यास पुढाकार घेवून खारीचा वाटा उचलाल हा विश्वास आहे.

यासंदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी आपण जवळच्या सरकारी दवाखान्यात, आय.सी.टी.सी. केंद्रात किंवा पी.पी. टी.सी.टी. प्रकल्पात काम करणा-या स्वयंसेवी संस्थेची मदत घेवू शकता. माहिती घेण्याबरोबरच आपल्या गावात एखादा कार्यक्रमही घेवू शकता.

**प्रमोद शिंपी**

जिल्हा समन्वयक JPSDP – PPTCT, पुणे

# स्पर्धेत उतरा तर खरं

प्रिय सहयोगिनीताई, मागिल अंकातील स्पर्धेत जे स्पर्धक विजेते ठरले आहेत त्यांची नावं खाली दिली आहेत. आपला स्पर्धेतला वाढणारा सहभाग आमचाही उत्साह वाढवत आहे. कमी खर्चात आणि चटकन स्पर्धेत सहभाग घेता येईल असे साधन म्हणजे मोबाइल. म्हणून मोबाइलच्या माध्यमातूनच स्पर्धा घेण्याचे ठरविले आहे.

**पहिले बक्षिस रु. १००० चे मनगटी घडयाळ**

सुनिता बदे, अहमदनगर

**चार बक्षिसं रु.५०० ची बॅग**

- वैशाली परसणे, बुलढाणा
- सुनंदा साखले, औरंगाबाद
- अरुणा सावरकर, अमरावती
- साधना कराळे, अमरावती

सर्व विजेत्यांचे अभिनंदन....

## यावेळेसची स्पर्धा

**यावेळेसही प्रश्नांची अचूक उत्तरं खाली दिलेल्या मोबाइल क्रमांकावर एसएमएस करा.** प्रश्नांच्या उत्तरांसाठी यावर्षी म्हणजे जानेवारी २०१२ पासून प्रसिध्द झालेल्या अंकांचा उपयोग आपण करु शकता. लॉटरीपध्दतीने विभागवार काढण्यात येणा-या प्रत्येकी एका विजेत्या सहयोगिनीला बक्षिस देण्यात येईल. म्हणजेच सहा विभागाच्या प्रत्यकी एका सहयोगिनीला विजेती म्हणून रु. ५०० चे बक्षिस देण्यात येईल.

## या स्पर्धेसाठीचे प्रश्न

१. 'कमळी मंजुळी' चे सदर केव्हा पासून सुरु झाले?
२. अन्नपदार्थांमधील जीवनसत्वांचे प्रमाण याविषयी कोणी मांडणी केली आहे?
३. 'स्त्रियांसाठी कायदे' या सदरात सर्वप्रथम कोणत्या कायदयाची माहिती देण्यात आली?
४. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना महाराष्ट्रातील कोणत्या जिल्हयांसाठी मान्य केली आहे?

**प्रश्नांची उत्तरं मो. क्र. ९४०७०२६७४२ या क्रमांकावर ०९ ते ११ ऑक्टोबर २०१२ या तीन दिवसात पाठवा.** दिलेल्या मुदतीच्या आधी किंवा नंतर येणा-या एसएमएस चा स्पर्धेत सहभाग होणार नाही. शिवाय एसएमएस पाठविताना उत्तरासह आपले नाव, जिल्हा आणि विभाग जरुर नोंदवा. स्पर्धेसाठी शुभेच्छा!!

# हे बदलाया हवं...

मेधा काळे

मंजुळी –कमळे, कुठं होतीस कालच्याला? बाहेरगावी गेलतीस का? दोनदा येऊन गेले बग. आत्यानं सांगितलं न्हाई?
कमळी –काय सांगू माय. मुरडत गेलते. दवाखान्यात.
मं. - कशापायी? काय व्हायलंय?
क.- मला न्हाय गं. माज्या बहिनीला ॲडमिट केलंय त्या म्हाताऱ्याच्या दवाखान्यात.
मं. - आस्सं? काय झालंय? दीस गेलेत जनू?
क.- आगं व्हत्याचं नव्हतं झालंय बग.
मं. आता? बस बरी अशी. आन् नीट उकलून सांग.
क.- मंजुळे, तुला तर ठावंच हाय, माज्या बहिनीला पहिली पोरगी झाली. तवाच पावना कावला होता. पर पहिली म्हनून गप ऱ्हायला. पर या बारला जर पोरगी झाली तर हाकलून देईन म्हनला. पोरगाच व्हायला हवा असा दम भरलाय मेल्यानं. माजी बहिन तर तुला माहितच हाय, निस्ती गरीब गाय हाय बग. जरा बी बोलत न्हाय.
मं. आगं पर इतकं काय हाय त्यात. पुढच्या बारला होईल पोरगा.
क.- पुढच्या? येडी का खुळी तू? दाजी सरपंच हायेत गावचे. दोन पोराहून जास्त पोरं झाली तर खुर्ची खाली करावी लागती. हायेस कुटं? त्यामुळं या बारला पोरगाच व्हाया पाहिजे.
मं. आगं पर आपल्या थोडीच हातात हाय? आन् उगा तपासून खाली करू नका बरं, कमळे. कायदा लई कडक झालाय माय.
क.- कसला कडक? त्या साळंपासला डॉक्टर रातच्या टायमाला तपसून देतो आन् पोरगी आसली तर त्येचा सासरा
खाली बी करतो. म्हनून ही शानी तिच्या शेजारनीला घिऊन गेली, तपसून आली आन् तिचं नशीब आसलं
वाईट की पोरगीच हुती बग.
मं.- मंग?
क.- मंग काय, आमाला काय सांगितलं नाय, गंठन मोडलं आन् जाऊन पाडून आली.
मं.- आरारारा...त्या डॉक्टरला माहित नाय का गं असं करता येत न्हाई ते?
क.- आगं भरीस भर, पोरगी न्हाई, पोराचा गर्भ पाडला बग म्हाताऱ्यानं.
मं. - कमळे, नको बाई सांगू असलं. येक तर गुन्हा करायचा आन् त्यात अशी लबाडी?
क.- आता काय करावं माय? सगळं झाल्यावर दाजीनी फोन केला म्हनून तिला डबा घेऊन गेलते. अशी रडली, अशी रडली. .... बरं. तू कशाला आली व्हतीस काल?
मं. - आगं ती तर येगळीच कथा हाय.
क.- काय झालं आता?
मं. - आगं ती सगुणा हाय ना, नान्याची? तिला चौथा महिना हाय. पहिलं लेकरु वरसाचं बी न्हाई आन् आता आजूक एक. तिला काय हे प्वार नकोय. हो नाही करत शेवटी आली होती माज्यापाशी, कुटं जाऊ म्हनून?
क.- आगं पर ऱ्हायलंय तर कशापायी पाडायचं?
मं. - आता कमळे, तुला तर माहित हाय, त्यो नान्या तर काय लेकराचं, बायकोचं बगत न्हाई. त्यात अजून एका पोराचं पोट कसं भरावं तिनं. आन् जर तिलाच जन्माला घालायचंय ना पोराला... नगं आसंल तर का म्हनून वाढवावं?
क.- मंग काय केलीस?
मं. - काय नाय...रिक्षा केला आन् जवळच्या दवाखान्यात गेलो. तर तितला डॉक्टर म्हनतो कसा. तिसरा महिना हून गेलाय, आमी काय खाली करून देनार नाय. तुमी सरकारीत जावा.
क.- मंग?
मं. - आता सरकारीत कसं जावं? हिचा दीर हाय थितं कामाला. त्याला समजलं म्हंजी? नान्याला पता लागल्यावर करू देनार हाय होय?
क.- आता, मंग काय करावं माय आता?
मं. - त्येच विचाराया तुज्याकडे आले व्हते तर तू गायबच. येकीकडे, पोरगी हाय म्हनून पाडायलेत डॉक्टर, आन् हितं नडलेली कुनी आली तर बरा कायदा आठवितो यांना?
क.- आगं काय शरमच न्हाई बग. तिकडच्या बीडातल्या येका डॉक्टरवर केस झाली, त्याची मिशन बंद केली तर मेल्यानं ताळं तोडून मिशन भिंतीत ठिवली आन् पुन्ना तपसून द्याया लागला. आता काय म्हनावं गं आसल्या लोकाला? आता हा साळंपासलाच डॉक्टर घे. पुन्यावरनं शिकून आला, दवाखाना टाकला. येका वर्षात ती




तपसायची मिशन आनली आन् तवाधरनं दवाखान्याची गर्दी हटंना झालीये बग त्येच्या. सकाळी ८ पासून ते रात्री १० पर्यंत दवाखाना चालूच. आन् निस्त्या गरोदर बायांची गर्दी बग. कुटकुटनं यायल्यात जिपा करून. पाच हज्जार घेतो माय तपसायचे.

मं. – आस्सं? आन् खाली करायचे?

क.– ते येगळे. हा निस्ता तपासनार. पोरगी आसली तर त्येच्या सासऱ्याच्या दवाखान्यात पाडाया जायाचं. त्याचे पाच येगळेच. हा.. पर इकडची खबर तिकडे न्हाई बग. निस्त्या खुना आन् चिठीवर काम होंतंय. कुठं सही नाय, नाव नाय...बहिनच सांगत होती माजी.

मं. – त्या म्हाताऱ्याची हाव सरत कशी नाय गं? माज्या जल्मापासनं हायच हा तितं.

क.– आगं पुन्या–मुंबईपरीस सस्तातच हाय म्हनायचा. तिथं तर निस्ते तपसायचेच धा घेतात. खाली करायचे येगळेच.

आता तिकलले लोक तर परदेशात जायलेत म्हनं पोरगा व्हावा म्हून. त्येंचं काय सांगावं माय मोठ्या लोकावाचं?

मं. – कसले आलेत गं मोठे? जरा खरवडलं की आतून भायेरून सारखेच हायेत बग. मला सांग तुमी पोलिसात केली का केस डॉक्टरइरोधात?

क.– कसं जावं? आपनच खोटं काम केलंय, उद्या उगा माज्या बहिनीला आत टाकली तर कुटं तोंड दाखवावं माय?

मं. – अशी कशी टाकतील आत? बायावाला टाकता येत न्हाई आसं. आन् ती काय आपनहून गेली का? नवऱ्यानं लावली म्हून गेली ना?

क.– आगं हो... पर लई बायांना आत केलंय बग. पोलिस तर मागंच लागलेत गरोदर बायांच्या. नजरच लागायची माय त्येंची. बाया आत आन् हे डॉक्टर, त्यांचे एजंट राजरोस भाईर. बाया सोडून कुनाला बी भ्या राह्यलं नाय.

मं. – बग की. परवा नानीची जाव आलती इचारत कुटं तपसून देतात का ते? तिची सून हाय ना गरोदर. तिला साफ सुनावलं मी, आसलं काय कराया जाशील तर आदी तुला आन् तुज्या लेकाला आत टाकते म्हून.

क.– आगं तिचा तरी काय दोष? पहिल्या चार पोरी हायता, वारस नको का माय? वंशाला दिवा?

मं. – कसला वारस आन् कसले दिवे घिऊन बसलीस? इतके सारे दिवे असून आजूक गावात तर काय त्यांचा उजेड पडंना बग कुटं. आन् तुला सांगते, पोरगा पोरगा म्हनून इतकं कवतिक करताव, म्हातारपनी साधा भाकर टुकडा घालत नाहीत मायबापाला. असले हायत तुमचे दिवे. फुटके.

क.–खरंय त्ये बी. पर कोन समजावावं आपल्या लोकाला?

मं. – लोकावाचं सोड. त्यांच्या मानंवरली भुतं लई जुनी हायेत. उतरतील सावकाश? पर डॉक्टर तर शाने सुरते हाइत न्हवं? तरी कसं करायलेत गं आसलं काम? पोरगी हाय का पोरगा कशापायी सांगावं त्येन्नी बी? त्यांनी सांगितलंच न्हाई तर आसला गुन्ना करतील का गं लोक?

क.– बरं त्यें समदं सोड. सगुनीचं काय करावं आता?

मं. – त्येच तर कळंना गेलंय बग. इतक्या बाता करायलेत लोक, मोठमोठी भाषनं झोडालयेत, दौरे काडायलेत, पर त्येच्यामुळं आमच्या आडगावातल्या एका बाईला तिच्या इच्छेनी मोकळं हुता येत नसंल तर काय उपेग गं सगळ्याचा? करनाऱ्याची मजा आन् बायावाला सजा असं आसंल तर कसं जमंल कमळे?

– मेधा काळे

# स्त्रियांसाठी कायदे

## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ/गैरवर्तन

*प्रिय सहयोगिनी ताई, तुमच्याशी या लेखाच्या माध्यमातून संवाद साधत असतानाच लोकसभेत दि. ०४ सप्टेंबर २०१२ रोजी याच याविषयीचे विधेयक मंजूर झाले. जेव्हा कायदयातील सविस्तर तरतूदी येतील तेव्हा याविषयी ची मांडणी होईलच. परंतु 'विशाखा' केसच्या संदर्भात न्यायालयीन आदेशाची माहिती जी या विधेकाचा महत्वाचा भाग आहे, याविषयी या लेखात माहिती करुन घेणार आहात.*

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होणे या गोष्टीचे गांभीर्य जगात सर्वत्र जाणवू लागले आहे. या छळाचे लक्ष्य स्त्रिया आणि पुरुष दोंघे असू शकतात. पण छळ

होणा-या अधिकांश व्यक्ती या स्त्रिया आहेत आणि करणारे पुरुष. 'आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेने' केलेल्या पाहणीचा निष्कर्ष असा आहे की संपूर्ण जगात कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ होणे हे इतके असहय होऊ लागले आहे की छळल्या जाणा-या स्त्रिया नोकरी सोडतात किंवा मानहानीचे दु:ख त्यांना भागावे लागते. भारतातील चित्रही असेच किंवा यापेक्षा गंभीर आहे. कारण छळ तीव्र असला तरी अजून त्याविषयी काही बोलले जात नाही. शिवाय गैरसमजही जास्त आहेत. म्हणूनच नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळ होणे म्हणजे काय आणि त्याच्याशी संबंधित इतर महत्वाच्या बाबी कोणत्या याचा विचार होणे गरजेचे आहे.

कामाच्या ठिकाणी होणारा छळ थांबविण्याची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीप्रमाणेच व्यवस्थापनाची आहे. यासंबंधी गैरसमज अधिक आहेत. विशेषत: या छळाला संबंधित महिलाच जबाबदार आहे, हा मोठया प्रमाणावर गैरसमज दिसून येतो. यासाठी गरज आहे लैंगिक छळाविषयी सविस्तरपणे माहिती करुन घेण्याची. १३ ऑगस्ट १९९७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात कामाच्या ठिकाणी होणा-या छळा संबंधात खालील मुद्दयांचा समावेश केला आहे.

### लैंगिक उद्देशाने केले जाणारे असभ्य वर्तन जसे -

- व्यक्तीच्या शरीराला, केसांना किंवा कपडयांना स्पर्श करणे, जवळ उभं राहणे किंवा खेटून उभं राहणे, कुरवाळणे, चुंबन घेणे, थोपटणे, किंवा हात फिरवणे.
- लैंगिक विनोद किंवा कथा सांगणे, व्यक्तीच्या शरीराबद्दल लैंगिक शेरा मारणे, लैंगिक जीवनाविषयी व्यक्तिगत प्रश्न विचारणे, सूचक लैंगिक शेरेबाजी करणे, प्रतिसाद नसताना एखादया व्यक्तीशी सतत असे वर्तन करणे, परिस्थितीचा फायदा घेवून अशा वर्तनासाठी भाग पाडणे. उदा. नोकरीची शाश्वती, बढतीच्या निमित्ताने इ.
- हातांनी किंवा शरीराच्या हालचालींनी लैंगिक/सूचक इशारे,कृति करणे, सूचक चित्रे, दिनदर्शिका, व्यंगचित्रे,



पोस्टर, नियतकालिके किंवा वस्तू कामाच्या ठिकाणी दाखवणे. व्यक्तीचा रस्ता अडवणे, व्यक्तीगत भेटवस्तू देणे इ.

## कर्मचा-यांच्या जबाबदा-या -

- याविषयासंबंधी चर्चा, सभा व्हाव्यात - ज्यामध्ये लैंगिक छळाचा अर्थ व परिणाम याविषयी खुली चर्चा व्हावी.
- यासंबंधी तक्रार दाखल करण्याची व्यवस्था व चौकशी समिती स्थापन करण्याची मालकाला/प्रमुखाला/व्यवस्थापनाला विनंती करावी.

## समिती कशी असावी -

- या समितीच्या अध्यक्षपदी पदी महिला असावी व कमीत कमी ५०टक्के सभासद महिला असाव्यात.
- स्वयंसेवी संस्था व याबद्दल काम करणा-या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग समितीत असावा जेणेकरुन व्यवस्थापनांमध्ये येऊ शकणा-या दबावांना रोखता येईल.

## मालक/प्रमुख/व्यवस्थापनांच्या जबाबदा-या -

- प्रतिबंधात्मक व्यवस्था म्हणून समिती स्थापन करावी.
- लैंगिक छळ हा शिस्तभंगाचा गुन्हा मानला जावा त्याप्रमाणे सेवेच्या नियमात योग्य ते बदल करुन या मुद्यांचा समावेश व्हावा.
- लैंगिक छळ होऊ नये म्हणून याबद्दल धोरण, नियम जाहीर करणे ते सर्वांना दिसतील, समजतील असे वितरित करणे.
- तक्रारींच्या चौकशीची पध्दत गोपनीय, कालमर्यादा असलेली, तक्रारींची योग्य दखल घेणारी, तक्रारदार व साक्षीदारांचे रक्षण करणारी असावी. संबंधित अधिका-यांकडे चौकशी अहवाल दाखल करावा.
- जिथे अशा प्रकारचे वर्तन फौजदारी नियमाखाली येत असेल तिथे पीडित व्यक्तींना सहाय्य व प्रतिकारासाठी आवश्यक ती मदत केली जावी.

कामाच्या ठिकाणच्या लैंगिक छळवणुकीचे परिणाम भयंकर आणि दीर्घकालीन होऊ शकतात. म्हणूनच न्याय्य, संवेदनशील व समतावादी समाज निर्माण करायचा असेल तर या छळाला अटकाव करणे व त्याविरुध्द योग्य कृती करणे निकडीचे आहे.

**लक्षात ठेवा - सरकारी, निमसरकारी, संघटित, असंघटित सर्व क्षेत्रात काम करणा-या पगारी, अर्धपगारी, मानधन घेणा-या वा स्वयंस्फूर्तीने विनावेतन काम करणा-या सर्व स्त्रियांना याची मदत घेता येऊ शकते.**

संदर्भ - नौकरीच्या ठिकाणी लैंगिक छळ, जीव ज्योती कौर - आयुषी दिवाळी अंक १९९६ आणि नारी समता मंच, पुणे - पोस्टर.

## आपला सहभाग

प्रिय सहयोगिनीताई,

आपण सर्वच बचतगट, महिला सबलीकरण, आरोग्य या आणि इतर विषयासंदर्भात आपल्या विभागात कार्यरत आहात. यासंदर्भातील झालेली प्रशिक्षणं, कार्यशाळांचा आपल्याला निश्चितच उपयोग होत असेल. शिवाय या अंकाची मदत होत असेल.

फिल्डमध्ये काम करताना विशेषत: महिलांच्या आरोग्यासंदर्भात काम करीत असताना काही विशेष किंवा लक्षणीय घटना आपल्या आठवणीत/स्मरणात असते. ती घटना किंवा बाब आपण हाताळल्यानंतर कधी यश मिळाल्याचा आनंद तर कधी प्रयत्न कमी पडल्याचे दु:खही होते. अशी ही लक्षणीय गोष्ट किंवा घटना जी 'महिला आणि आरोग्य' यासंदर्भातील असेल ती जरुर लिहून पाठवा. यावर्षीच्या शेवटच्या म्हणजे सहाव्या अंकात आपल्या नावासह छापणार आहोत. अर्थात यासाठी आपले विभागीय अधिकारी आपणाला निश्चितच मदत करतील. कारण प्रत्येक विभागातील एकतरी लक्षणीय किंवा विशेष घटना प्रसिध्द करण्यात येणार आहे.

आतापासूनच लिहिण्यास सुरुवात करा.

आपले,
संपादकीय मंडळ

# इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना

एकटया महिलांसाठी (सरकारच्या भाषेत निराधार) ही योजना राबविण्यात येते. सर्वच विभागातल्या म्हणजे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही महिलांसाठी लागू आहे. या योजनेअंर्तगत देण्यात येणा-या आर्थिक सहाय्यामध्ये केंद्र शासनातर्फे रु. २०० आणि राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रु. ४०० असे एकूण रु. ६०० मिळतात. एकाच घरात एका पेक्षा अधिक व्यक्ती योजनेसाठी पात्र ठरल्या तर रु. ९०० मिळतात. मात्र यासा. ठी गरजेचे आहे शासनाने घातलेल्या अटी आणि शर्तींची पूर्तता होणे. ज्या खालीलप्रमाणे आहेत.

- वय - ४० वर्षे ते ६५ वर्षाच्या आतील विधवा महिला.
- कुटुंबाचे उत्पन्न - दारिद्रयरेषेखालील यादीत नाव असावे.
- मृत्युचा दाखला - जोडीदाराचे म्हणजे पतीचे निधन झाल्याचे संबंधीत ग्रामपंचायत/नगरपरिषद/ महानगरपालिका कार्यालयातील मृत्यु नोंदवहीतील उतारा - झेरॉक्स जोडावी.
- वयाचा दाखला - ग्रामपंचायत/नगरपालिका/ महानगरपालिका जन्मनोंद वहीतील उता-याची सांक्षाकित (अटेस्टेड) प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, निवडणूक कार्ड किंवा ग्रामीण/ नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा त्या दर्जाच्या शासकीय वैद्यकीय अधिका-याने दिलेला वयाचा दाखला.
- उत्पन्नाचा दाखला - दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती किंवा कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा उतारा.
- रहिवासी दाखला - ग्रामसेवक/तलाठी/मंडळ निरीक्षक यांनी दिलेला रहिवासी असल्याबद्दलचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवासी दाखला ग्राहय धरण्यात येईल.

वरील कागदपत्रांची पूर्तता किंवा जुळवाजुळव झाल्यानंतर त्यांची झेरॉक्स करुन साक्षांकित म्हणजे अटेस्टेड (शाळेचे मुख्याध्यापक/ विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची सही व शिक्का) करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात, ग्रामसेवकाकडून अर्जाचा नमूना घेवून कागदपत्र जोडल्यानंतर तलाठयांकडे तो दयावा. शहरी भागात मामलेदार कचेरी म्हणजे तहसीलदार कार्यालयात संबंधित विभागात अर्ज सादर करावा लागतो. ज्या महिलेला अर्ज करायचा आहे तिने स्वत: प्रत्यक्ष जावून अर्ज देणे गरजेचे आहे.

अर्ज करण्यापूर्वी, जर संबंधित महिला शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ किंवा पैसे घेत असेल तर या योजनेसाठी अर्ज करु शकत नाही किंवा अपात्र असेल.

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

**महिला आर्थिक विकास महामंडळ**
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, बांद्रा पूर्व, मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी : (०२२) २६५९१६२९ / २६५९०५७४ / २६५९१८६६
mavim.ho@gmail.com, www.mavimindia.org

**वाचकांसाठी संपर्काचा पत्ता : तथापि ट्रस्ट,**
रेणूप्रकाश अ, तिसरा मजला, ८१७ सदाशिव पेठ, पुणे-३०
(०२०) २४४३११०६ /२४४३००५७
tathapi@tathapi.org, www.tathapi.org

मुद्रक : संस्कृती डिझायनर्स आणि प्रिंटर्स